# प्रकरण चौथे

# खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण – सामाजिक कार्याचे योगदान

# प्रकरण चौथे

# खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण – सामाजिक कार्याचे योगदान

१९व्या शतकाच्या सुरुवातीला भारत देश सामाजिक, आर्थिक, राजकीयदृष्ट्या कमकुवत देश होता. भारताची सर्वच आघाडीवर शोचनीय स्थिती होती. या पार्श्वभूमीवर ब्रिटिशांनी आपली सत्ता या देशात प्रस्थापित केली. भारतात प्रथम भारतीय समाजसुधारणेची सुरुवात राजा राममोहन रॉय यांनी केली. त्यांनी बंगालमध्ये ब्राह्मोसमाजाची स्थापना केली. विशेषत: महाराष्ट्रात हा विचार अतिशय वेगाने पोहोचला. ''महाराष्ट्रात खऱ्या अर्थाने सामाजिक सुधारणा चळवळ संत गाडगे महाराज, महात्मा जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर ते आजच्या अण्णा हजारे, बाबा आमटे, बाबा आढाव, सिंधूताई सपकाळ यांच्यापर्यंत अनेक समाजसुधारकांनी चालवली व समाजपरिवर्तन केले.''[१] पश्चिम महाराष्ट्रातील काँग्रेसनिष्ठ महिला नेतृत्त्व खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी ही या पद्धतीने आपल्या मतदारसंघात, जिल्ह्यात, महाराष्ट्रात, देशात शिक्षणाच्या व नवनेतृत्त्व निर्मितीच्या माध्यमातून समाजपरिवर्तन केले. तसेच अनेक लोकांना मदत करून सामाजिक व शैक्षणिक कार्य केले आहे.

खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी १९५२ पासून पती केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांच्या राजकीय कार्यात सहकार्य केले. त्याचबरोबर त्यांनी सामाजिक कार्यालाही सुरुवात केली होती. श्रीमती प्रेमलाकाकींचा सामाजिक, राजकीय कार्याचा कालावधी असा होता की, त्यावेळी भारतीय समाजात स्त्रियांवर अनेक बंधने लादलेली होती. परकीय आक्रमणामुळे भारतीय स्त्रीला पडदा पद्धत घोषा पद्धत यासारख्या बंधनात गुरफटून ठेवलेले होते. स्त्रियांचे 'चूल आणि मूल'

ऐवढेच कार्यक्षेत्र हाते. अशी सामाजिक परिस्थिती असताना कुंभारगाव या खेड्यातील एका शेतकरी व्यक्तीची सून घराबाहेर पडते, सभा घेते, मोर्चे काढते, महिलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करते. हे कार्य त्यावेळी क्रांतीकारक स्वरूपाचेच होते. प्रेमलाकाकीना सामाजिक कार्याची जाणीव होती आणि आवड होती. याचबरोबर केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांचा पाठींबा होता. त्यामुळे सामाजिक, राजकीय कार्य करत असताना त्यांना फारशा अडचणी आल्या नाहीत.

१९५० मध्ये श्रीमती प्रेमलाकाकी यांनी कराड येथील पाटण कॉलनीत केशवराव पवार यांच्या घरी मॉन्टेसरीची स्थापना केली. स्वत: शिक्षिका झाल्या. यामध्ये त्यांना कधीही कमीपणा वाटत नव्हता. प्रथम केवळ १५ विद्यार्थी या मॉंटेसरीमध्ये होते. सध्या हे १५ विद्यार्थी उच्च पदावर कार्यरत आहेत. त्यातीलच एक पंतप्रधान कार्यालयाचे राज्यमंत्री खा. पृथ्वीराज चव्हाण हे होत. केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण आणि खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या सुसंस्कारामुळे आणि विद्वत्ताकुशलतेमुळे ते आजही भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसशी एकनिष्ठ आहेत. आज खा. श्री. पृर्थ्वीराज चव्हाण कॉंग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी आणि पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्यात दुवा साधण्याचे कार्य करत आहेत. ''श्रीमती प्रेमलाकाकी यांनी विवाहानंतर इंदूरमध्ये मॉन्टेसरीचा डिप्लोमा केला.''[२] 'आदी प्रपंच करावा नेटका' या उक्तीप्रमाणे त्यांनी आपल्या तीनही मुलांना शिकविले. याचबरोबर आपल्या नातेवाईकांच्या मुलांना, गरिब व होतकरू विद्यार्थ्यांना शिकविले. त्यांना स्थिरस्थावर केले. काही अनाथ मुलींची सालंकृत कन्यादाने केली.

खा.श्रीमती प्रेमलाकाकीना शिक्षणाची ओढ होती. सतत वाचन, लेखन त्या करत असत. त्यांनी वि.स. खांडेकर आणि ना.सी. फडके यांची सर्व पुस्तके वाचून काढली. स्वत: शिक्षण घेतले. विविध कोर्स केले. त्यामुळे आपल्या देशाच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाची किती आवश्यकता आहे याची जाणीव त्यांना

होती. त्यामुळे त्यांनी समाजातील प्रत्येक घटकापर्यंत शिक्षण पोहोचविले पहिजे यादृष्टीने प्रयत्न केले. यामध्ये त्यांनी मुलीना मोफत शिक्षण, प्रौढ शिक्षणाची आवश्यकता, दारिद्र्यरेषेखालील मुलांना शिक्षणाच्या सुविधा मिळण्यासाठी प्रयत्न, आदीवासी समाजातील मुलांना शिक्षण मिळाले पाहिजे तरच त्यांचा विकास होईल अशी मागणी त्यांनी केंद्रसरकारकडे केली. खा. प्रेमलाकाकींनी आपल्या मतदारसंघात विविध ठिकाणी ग्रामीण विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय व्हावी यासाठी महाविद्यालये, कॉलेज स्थापन केली आहेत. त्यांनी ग्रामीण भागातील समस्या सोडविण्याचा प्रामुख्याने प्रयत्न केला आहे.

**श्रीमती प्रेमलाकाकींचे शिक्षणातून समाजपरिवर्तनाचे योगदान :**

महाराष्ट्रात शिक्षणातून समाजपरिवर्तन करणारे अनेक समाजसुधारक आहेत. यामध्ये प्रथम समाजपरिवर्तन करण्याचा ध्यास डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा जोतिराव फुले यांनी घेतला होता. त्याचबरोबर लोकमान्य टिळक, महर्षी कर्वे, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी लोकशिक्षण दिले. महात्मा फुले, सावित्रीबाई फुले यांनी ग्रामीण शिक्षण आणि मुलींच्या शिक्षणाच्या चळवळी केल्या. ''खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण यांच्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर, जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा प्रभाव होता.''[३] यातूनच त्यांना शैक्षणिक सुधारणेची प्रेरणा मिळाली.

कराड लोकसभा मतदारसंघामध्ये मुलींच्या शिक्षणासाठी स्वामी विवेकानंद ही एकच संस्था होती. शहरी विद्यार्थ्यांबरोबर ग्रामीण मुलांनाही शिक्षण मिळावे, शिक्षणाची जाणीव खेड्यापाड्यापर्यंत पोहोचावी यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यातून समाजपरिवर्तन होईल असे त्यांना मनापासून वाटत होते.

प्रत्येक घरातील प्रत्येक महिलेला शिक्षण दिले पाहिजे. तरच तिच्यात वैचारिक, सामाजिक सुधारणा होतील. स्त्रीशिक्षणामुळे कुटूंब सुधारणा होईल व यातून

समाजसुधारणा होतील. या तत्त्वानुसार श्रीमती प्रेमलाकाकींनी महिला शिक्षणावर अधिक भर दिला. ग्रामीण मुलांची शिक्षणाची सोय व्हावी या उद्देशाने प्रेरित होऊन त्यांनी कराड लोकसभा मतदार संघात, ग्रामीण भागात प्राथमिक, माध्यमिक विद्यालय, महाविद्यालये सुरू केली. काही शैक्षणिक संस्थाना मदत केली.

**श्रीमती प्रेमलाकाकींनी सुरू केलेली प्राथमिक, माध्यमिक महाविद्यालये:**

"१) इंदिरा गांधी प्रशाला, मसूर.

२) श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण विद्यालय, मलकापूर

३) श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण कन्या महाविद्यालय, इस्लामपूर - या महाविद्यालयास श्रीमती प्रेमलाकाकी यांची खास बाब म्हणून महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांचेकडून मान्यता मिळाली.

४) आनंदराव चव्हाण विद्यालय, पोतले

५) मळाईदेवी शिक्षणसंस्था, कुंभारगाव

६) श्रीमती प्रेमलाताई चव्हाण कृषी सहकारी पतसंस्था

७) श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण पॉलिटेक्निकल आणि इंजिनिअरिंग कॉलेज, कराड ."[४]

महाराष्ट्रात पुण्यानंतर कराडमध्ये शिक्षणाची सोय आहे. इंजिनिअरिंग कॉलेज व सरकारी तंत्रनिकेतन कराड मध्ये आहे. १९८२-८३ दरम्यान तांत्रिक शिक्षणाची कोंडी निर्माण झाली होती. ८० टक्के गुण प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना ही तंत्रशिक्षणा-पासून वंचित रहावे लागले. याकाळात महाराष्ट्रात विविध औद्योगिक प्रकल्प सुरू झाले. साहजिकच यासाठी लागणारे तंज्ञांची, अभियंता यांची कमतरता भासू लागली. ही कमतरता भरून काढण्यासाठी सरकारने शेजारील राष्ट्रातील तंज्ञाना

बोलावले. याचा परिणाम असा झाला की ग्रामीण तरूणांना नोकरीसाठी झगडावे लागले. या समस्या दूर करण्यासाठी ''महाराष्ट्र शासनाने विनाअनुदान तत्त्वावर उच्च तांत्रिक शिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्यासाठी नविन तंत्रनिकेतन व इंजिनिअरिंग कॉलेजना मान्यता दिली. यावेळी ३४ इंजिनिअरिंग कॉलेज व ४५ तंत्रनिकेतन सुरू करण्यास सरकारने अनुमती दिली.''[५] या सवलतीचा फायदा घेऊन त्यांनी आपल्या मतदारसंघातील ग्रामीण विद्यार्थ्यांची सोय व्हावी या उद्देशाने कराडमध्ये 'प्रेमलाताई चव्हाण तंत्रनिकेतर' सुरू केले.

''कराडच्या श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण तंत्रनिकेतनचे वैशिष्ट्य असे की, महाविद्यालय स्थापन करण्यासाठी श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी कोणत्याही साखर कारखान्याचे, सहकारी संस्थेचे सहकार्य घेतले नाही.''[६] कराड-पाटण तालुक्यातील युवकांच्या आशा, आकांक्षा पल्लवीत होतील असा धाडसी निर्णय त्यांनी घेतला. त्याचबरोबर ''त्यांनी असा एक पाच वर्षाचा आर्किटेक्चरचा डिप्लोमा उपलब्ध करून दिला की जो सुमारे १२५ वर्षापूर्वी मुंबई येथे इंग्रजांनी सुरू केलेल्या तंत्रशाखेत होता. त्यानंतर हा डिप्लोमा कराडला सुरू केला. यामध्ये श्रीमती प्रेमलाकाकी यांचा अधिक पुढाकार आहे.''[७]

श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण पॉलिटेक्निकल आणि इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये ट्रेसर, कन्स्ट्रक्शन सुपरवायझर, ड्रॉफ्टसमन, आर्किटेक्चर, ज्यूस ट्रीटमेंट, शुगर टेक, पॅग बायलिंग, ड्रॉफ्टसमन, इलेक्ट्रीकल, वायरमन, मोटर रिवायडींग, रेडिओ सर्व्हीसिंग, इंटेरिअर डेकोरेशन, ड्राफ्टसमन मॅकॅनिकल इ. कोर्सेस येथे आहेत.

''कराड शहरात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचे शिक्षण मिळावे म्हणून प्रेमलाताई चव्हाण पॉलिटेक्निकल इन्स्टिट्यूट, आयटीआय, मल्टीपरपज

हायस्कूल, कराड येथे त्यांनी पुढाकार घेऊन स्थापन केले.''[८] ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा त्यांचा उदात्त हेतू या संस्था स्थापन करण्यापाठीमागे आहे.

''इंदिरा गांधी प्रशाला मसूर, श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण महाविद्यालय, मलकापूर, श्रीमीत प्रेमलाकाकी चव्हाण कन्या महाविद्यालय, इस्लामपूर इ. शिक्षण संस्थातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी विविध कोर्सेस ठेवण्यात आलेले आहेत. यामध्ये १० वी पास मुलीना शिवणकाम, विणकाम, भरतकाम, क्रॉप्ट डी.एड., टायपिंग, होमसायन्स, एम्ब्रॉयडरी इ. विषयाचे मार्गदर्शन दिले जात आहे.''[९]

महिला शिक्षणावर त्यांनी अधिक भर दिला. तळागाळातील महिलांनी शिक्षण घेतले पाहिजे. समाजकार्यात पुढे आले पाहिजे, स्वत:च्या पायावर भक्कमपणे उभे राहिले पाहिजे, असे त्यांना मनापासून वाटत होते. खासदार असताना त्यांनी स्त्री शिक्षणासाठी विशेष प्रयत्न केले. मुलींना मोफत शिक्षण मिळावे, शैक्षणिक सोयी-सुविधा दिल्या जाव्यात यासाठी लोकसभेत, राज्यसभेत प्रश्न मांडले. या मागण्या सरकारकडून मंजूर करून घेतल्या. १९७८ मध्ये त्यांनी उच्च शिक्षणासाठी अनुदान मिळावे अशी मागणी केंद्रसरकारकडे केली. उच्च शिक्षणात सुधारणा होण्यासाठी अनुदान दिले जावे असे त्यांनी लोकसभेत प्रतिपादन केले.

''उच्च शिक्षणाबरोबरच प्रौढ शिक्षणही दिले पाहिजे, खाजगी शिक्षणसंस्थांचे राष्ट्रीयीकरण झाले पाहिजे, प्रत्येक राज्यात हिंदी, इंग्रजी व प्रांतिक अशा तीन भाषेतून शिक्षण दिले जावे.''[१०] अशा मागण्या लोकसभेत केल्या. भारताची वाढती लोकसंख्या लक्षात घेता बेरोजगारी वाढत आहे. ही समस्या सोडविण्यासाठी सरकारने देशात व्यावसायिक शिक्षण देणाऱ्या शाळा बहुसंख्येने सुरू कराव्यात.

<u>प्रकरण चौथे</u>

खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी समाजातील प्रत्येक घटक साक्षर झाला पहिजे या हेतूने प्रेरित होऊन शिक्षण प्रसार केला. समाजपरिवर्तन व्हावे असे त्यांना मनापासून वाटत होते. परंतु हा बदल करण्यासाठी शिक्षण आवश्यक होते. त्यामुळे त्यांनी महिला शिक्षण, प्रौढ शिक्षणासाठी अनेक कार्यक्रम राबविले. अनुसुचित जाती-जमातीना शिक्षण मिळावे, त्यांचा विकास व्हावा यासाठी शैक्षणिक सुविधांची मागणी खा. प्रेमलाकाकींनी राज्यसभेत केली.

"अनुसूचीत जाती जमातीना सोयीस्कर, योग्य अंतरावर शाळा सुरू कराव्यात, या शाळांना वेळोवेळी आर्थिक सहाय्य देणे, विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके, शालेय साहित्य, जेवण देणे,पालकांना प्रोत्साहन देणे इ. सुविधा पुरविण्यासाठी श्रीमती प्रेमलाकाकीनी प्रयत्न केले."[११]

## करा़ड लोकसभा मतदारसंघातील सामाजिक कार्याचे योगदान :

खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण या महाराष्ट्र काँग्रेस कमिटीच्या माजी प्रांताध्यक्षा होत्या. महामंत्री श्रीमती इंदिराजी गांधी यांच्या विचाराच्या कट्टर एकनिष्ठ असलेल्या काँग्रेस कार्यकर्त्या होत्या. त्यांनी कोणत्याही सत्तास्थानाची अभिलाषा केली नाही. माजी केंद्रियमंत्री आनंदराव चव्हाण यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील व शहरी भागातील जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी खासदार म्हणून त्या सतत कार्यरत राहिल्या.

खा.श्रीमती प्रेमलाकाकी यांचा राजकीय कार्याबरोबरच सामाजिक कार्याचा आलेख ही मोठा आहे. सर्वसामान्य गरीब जनतेच्या समस्या समजून घेणे, त्याचे म्हणणे ऐकूण घेणे त्याला वाचा फोडण्याचे कार्य त्यांनी एकनिष्ठेने केले. त्यामुळेच त्या जनसामान्यांत लोकप्रिय झाल्या. 'नाही' हा शब्द त्यांच्या शब्दकोशात नव्हता. असे

असले तरी त्यांनी कधीही तत्त्वाशी तडजोड केली नाही. आपल्या अधिकाराच्या मर्यादा ओळखून त्यांनी लोकांना सहकार्य केले. त्यांच्याकडे गेलेली व्यक्ती मग ती सामान्य असो, गरीब असो अथवा विरोधक असो, विधायक कार्यासाठी, जनहिताच्या कार्यासाठी त्यांनी सर्वानाच मदत केलेली आहे. त्यांच्या या स्वभावगुणामुळे संपूर्ण महाराष्ट्र 'माँ' आणि 'काकी' या नावाने ओळखतो. सामान्य लोकांनाही त्या कधी परक्या वाटत नव्हत्या. ऐवढा जिव्हाळा त्यांनी जनसामान्यांच्यात निर्माण केलेला होता.

## १. महिलांसाठी रचनात्मक कार्य :

आपला देश पुरूषप्रधान आहे. सामाजिक, राजकीय क्षेत्रात स्त्रियांना दुय्यम स्थान दिले जाते. स्वातंत्र्यपूर्व काळात जेव्हा परकीयांची सत्ता भारतावर होती तेव्हा भारतीय समाजाने स्त्रियांवर अनेक सामाजिक बंधने लादली. स्वातंत्र्य चळवळीच्या काळात राणी लक्ष्मीबाई, देवी अहिल्याबाई यांनी खऱ्या अर्थाने ही बंधने झुगारून देऊन स्वातंत्र्यलढ्यात पुढाकार घेतला. स्वातंत्र्यानंतर राजा राममोहन रॉय, महात्मा फुले, लो. टिळक, महात्मा गांधी या महान नेत्यांनी स्त्रीमुक्तीसाठी प्रयत्न केले. या समाजसुधारकांनी स्त्रीशिक्षणावर भर दिला त्यामुळे आज आमच्या भारतीय महिला शेतमजुरापासून पंतप्रधान, राष्ट्रपतीपदापर्यंत पोहोचलेल्या आहेत. आज भारतातील सर्वोच्च पद सौ. प्रतिभाताई पाटील यांच्या रूपाने एक महिला भूषवित आहे. या यशापाठीमागचा आधार समजाने महिलाना योग्य, मार्गदर्शक शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध करून दिल्या हेच आहे.

स्त्रीचे कार्यक्षेत्र ही घरापर्यतच मर्यादित न रहाता तिला समाजात मान, प्रतिष्ठा, मिळावी ती आर्थिकदृष्ट्या सबल व्हावी, महिला सर्व दृष्टिकोणातून स्वावलंबी

व्हाव्यात यासाठी सरकारने महिलांसाठी कुटीरउद्योग, लघुउद्योगासाठी सहकार्य करावे यासाठी अनुदान द्यावे अशी मागणी केली. महिलांना सर्वच क्षेत्रात आरक्षण मिळाले पाहिजे. प्रत्येक औद्योगिक कारखान्यात महिलांसाठी राखीव जागा असाव्यात अशा औद्योगिक संस्थाना सरकारने विशेष सवलती द्याव्यात अशी मागणी त्यांनी लोकसभेत केली.

''१९८४ मध्ये त्या लोकसभेवर बहुमताने निवडूण गेल्या. या दरम्यान त्यांनी विद्यापीठ अनुदान मंडळाद्वारा जास्तीत जास्त केंद्रिय अनुदान अनेक संस्थाना मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. तसेच महिला, वसतिगृह यासाठी मदत मिळवून दिली.''[१२]

भारतासारख्या खंडप्राय देशात ५० टक्के सरासरी महिला मतदार आहेत. महिलांच्या ज्वलंत समस्या काय आहेत त्या जाणून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी त्यांनी सर्व राजकीय, सामाजिक,सार्वजनिक शक्ती केंद्रित केली. महिलांच्या रचनात्मक व विधायक कार्यात त्यांनी पुढाकार घेतला.

खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण या इंदोर वनिता मंडळाच्या संस्थापक होत्या. त्यांनी प्रथम कराडमध्ये अखिल भारतीय महिला मंडळाची शाखा सुरू केली. कराडमध्ये सर्वप्रथम महिलामंडळाची सभा श्रीमती प्रेमलाकाकी यांनी घेतली. ग्रामीण भागात महिला मंडळाची स्थापना केली.

श्रीमती प्रेमलाकाकी खासदार असताना अनेक अखिल भारतीय समित्यांवर कार्य केले. यामध्ये ''अखिल भारतीय महिला क्रिकेट संघटनेच्या अध्यक्षा, महाराष्ट्र महिला हँडबॉल संघटनेच्या अध्यक्षा, अखिलभारतीय मुकबधीर संस्थेच्या अध्यक्षा म्हणून कार्यरत होत्या. या संस्थेच्या कार्याने प्रेरित होऊन मुकबधीर संस्थेसाठी आंध्रप्रदेशाचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री. एन.टी. रामराव यांनी ५६ लाख रू. ची देणगी

दिली. या देणगीतून प्रेमलाकाकींनी मुकबधीर शिक्षक प्रशालेची स्थापना केली.''[१३] अखिल भारतीय बिझनेस व प्रोफेशनल विमेन्स असोसिएशनच्या अध्यक्षा म्हणून त्या काही दिवस कार्यरत होत्या. अनेक महिला उद्योजकांना त्यांनी सर्वोतोपरी सहाय्य केले. ''तीन आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये भारताचे प्रतिनिधीत्व त्यांनी केले या परिषदेमध्ये महिला बचत गट, महिला संघटना इ.संकल्पना मांडल्या आणि त्यांच्या आवश्यकता सांगितली.''[१४]

महिलांनी सामाजिक, राजकीय कार्यात सहभागी व्हावे यासाठी त्यांनी कराडमध्ये किचन गार्डन सुरू केले. या माध्यमातून महिला एकत्र येतील, विचारविनिमय करतील यातून त्यांचा विकास होईल हा उद्देश ठेवून विविध कार्यक्रमाचे आयोजन यातून केले जात असे. याचबरोबर महिला मंडळाकडून अनेक घरगुती व आवश्यक वस्तुंचे प्रदर्शन भरविले जात असे. यातून स्त्रियांच्या विकासाला प्रेरणा देण्याचे कार्य श्रीमती प्रेमलाकाकी यांनी केले.

## २. निराधार मुलींचे पुनर्वसन :

श्रीमती प्रेमलाकाकीनी जात-पात न पहाता बहुजनसमाजातील गोरगरिब, निराधार अशा काही मुलांना सांभाळले. त्यांना लहानाचे मोठे केले. निराधार मुलींचे उपवर झाल्यानंतर आपण स्वत: त्याचे पालकत्व स्वीकारले. त्यांचे विवाह त्यांच्या पसंतीप्रमाणे मोठ्या थाटाने करून दिले. त्यांनी हे विवाह सोहळे कन्यादान, मानपान, सिमांत पुजन, स्त्रीधन आदि धार्मिक विधीयुक्त, मिष्टान्न भोजनासह साजरे केलेले आहेत. अशाप्रकारे गोरगरीब, निराधार मुलीचे १०० टक्के पुनर्वसन करणे हे त्यांच्या जीवनातील एक महत्त्वाचे कार्य एक आवड म्हणून त्यांनी केले.

## ३. औद्योगिक सहाय्य :

स्त्रियांच्या समस्यांबरोबरच त्यांनी ग्रामीण विकास व औद्योगिकरण यासारख्या प्रश्नावर लोकसभेत सातत्याने आवाज उठवला. कराड लोकसभा मतदार संघासाठी औद्योगिक वसाहत मंजूर करून घेतली. कराड येथे दूरदर्शन केंद्राला मान्यता मिळवून घेतली. ''ग्रामीण विकासासाठी आगाशिव सहकारी सूत गिरण स्थापन करण्यासाठी श्रीमती प्रेमलाकाकींनी पुढाकार घेतला.''[१५] त्याचबरोबर विश्वास सहकारी साखर कारखाना, शिराळा, हुतात्मा सहकारी साखर कारखाना,वाळवा, ओगले काचकारखाना ओगलेवाडी इ. औद्योगिक वसाहतींना आणि कारखान्यांना सुस्थितीत आणण्यासाठी सहकार्य केले. यापाठीमागे त्यांचा सर्वसामान्य लोकांचा यातून फायदा होईल, ते आर्थिकदृष्ट्या सबल होतील असा उदात्त हेतू होता.

खा. प्रेमलाकाकी चव्हाण यांनी स्वत:च्या अशा काही सहकारी संस्था सुरू केल्या नाहीत. तसा त्यांचा काही मानस नव्हता. कदाचित या संस्थेतील भ्रष्टाचार, गटबाजीचे राजकारण त्यांना अपेक्षित नसेल. ''श्रीमती प्रेमलाताईंनी आपल्या कराड लोकसभा मतदार संघात 'शिवदर्शन' सहकारी साखर कारखाना उभारण्याचा प्रयत्न केला. परंतु स्थानिक विरोधामुळे त्यांना या कार्यात अपयश आले.''[१६] त्यांनी जरी सहकारी संस्था उभारल्या नसल्या तरी त्यांनी अस्तित्वात असलेल्या, जनहितासाठी चालू झालेल्या सर्वच औद्योगिक वसाहतीना, सहकारी संस्थाना मदत केली.

## ४. डोंगरी विकास निधीचे आयोजन :

''पाटण, सातारा, सांगली हा भाग आर्थिकदृष्ट्या मागास म्हणून जाहिर करा अशी मागणी खा. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी लोकसभेत केली.''[१६] ती अशा स्वरूपाची होती की, सातारचा पश्चिम भाग डोंगराळ आणि पूर्व भाग दुष्काळी

स्वरूपाचा आहे. यामध्ये खटाव, माण, फलटण, कराड उत्तर, कोरेगाव पूर्व हा भाग येतो आणि सांगलीचा पश्चिम भाग डोंगराळ व पूर्व भाग दुष्काळी आहे. यामध्ये शिराळा, पेठ, मिरज, कवठेमहांकाळ हा प्रदेश येतो. पाटण तालुका हा बहुतांशी डोंगराळ आहे. त्यामुळे पाटण, सातारा, सांगली हे जिल्हे जरी कृष्णा नदीच्या काठी वसलेले आहेत म्हणून ते पूर्णपणे सदन आहेत असे समजू नये. या जिल्ह्यातील डोंगरी व दुष्काळी भागाच्या विकासासाठी सरकारने विविध योजनांच्या माध्यमातून निधी उपलब्ध करून दिलेला आहे. याचा फायदा या भागासाठीही व्हावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले. यासाठी त्यांनी डोंगरी भागातील आमदार विलासराव पाटील, गुरुनाथ पाटील, नरसिंह एकनाथ पाटील या लोकांचे शासनपातळीवर सहाय्य घेतले. आणि डोंगरी विकास परिषद निधी चालू केला. ''श्रीमती प्रेमलाकाकींनी पाटण डोंगराळ विभागासाठी डोंगरी विकास निधीची स्थापना केली. यामुळे या निधीचा फायदा महाराष्ट्रातील ६८ तालुक्याना झाला.''[१८]

५. ''भारताचे तत्कालीन केंद्रिय अन्नमंत्री राव विरेंद्रसिंग हे होते. तेंव्हा खा. प्रेमलाकाकी यांनी तेल व तेलबिया उत्पन्न वाढीसाठी संशोधन व्हावे यासाठी मागणी केली. त्याचबरोबर त्यासाठी अनुदान मंजूर करून घेतले.''[१९]

६. ''कोयना धरणग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी त्यांनी 'पुरग्रस्त सहाय्य समितीची' निर्मिती केली. त्यातून त्यांना आर्थिक व आवश्यक मदत केली.

७. पाटण, शिराळा, जावळी तालुक्यातील दुर्गम भागात रस्ते, विद्युतीकरण, शाळा, पाणी पुरवठा, दुरध्वनी सुविधेसाठी त्यांनी खास प्रयत्न केले.

८. इस्लामपूर येथे नविन कुटीर रूग्णालय मंजूर केले.

९. येळगाव, येणपे येथील पाझर तलावासाठी त्यांनी पुढाकार घेतला.

१०. पाटण तालुक्यातील पाणी प्रश्न त्यांनी सोडवला. त्यासाठी शेंडेवाडी व चाळकेवाडी पाझर तलावास त्यांनी केंद्रसरकारची मंजूरी मिळवून घेतली.

११. तासवडे, येळगाव, दुशेरे, शेरे इ. अनेक नविन वसाहतीला पाणीपुरवठ्यासाठी शासनाच्या विविध योजनामधून सहकार्य केले.

१२. कराड–ढेबेवाडी रस्ता डांबरीकरण होण्यासाठी मंजूरी मिळविली.

१३. चिखली, ता. कराड येथील नविन पुलास तसेच तेथील माध्यमिक शाळेस मंजूरी मिळवून दिली.''[२०]

१४. इंदूर येथे इंडियन वुमेनस सर्व्हीस या स्त्रियांच्या प्रशासकिय शिक्षण संस्था स्थापन करून स्त्रियांना सर्वोतोपरी सहकार्य केले.

१५. कराड येथे ऑल इंडिया वुमेन्स कॉन्फरन्सची शाखा निर्माण केली. त्याच्या अध्यक्षा श्रीमती प्रेमलाकाकी होत्या. या माध्यमातून महिलांसाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले.

१६. अनेक महिला लघुउद्योजकांना सर्वोतोपरी सहाय्य केले.

१७. हॉस्पिटल वेल्फेअर सोसायटी दिल्ली या संस्थेच्या त्या अध्यक्षा होत्या. दिल्लीत असताना त्यांनी रूग्णांची सेवा सर्वाधिक केली.

१८. धारातीर्थी पडलेल्या जवानांच्या विधवांना त्यांची संपत्ती परत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील होत्या.

१९. श्रीमती प्रेमलाकाकी हिंदी साहित्य संघाच्या सदस्या होत्या. त्यामुळे त्यांनी संपूर्ण भारतभर हिंदी प्रचारार्थ प्रवास केला.

२०. नागरी विमान, टुरिझम शास्त्र, तंत्रज्ञान या समितीवर त्यांनी यशस्वीरित्या कार्य केले. नागरिकांना योग्य सोयी–सुविधा मिळाव्यात त्यासंदर्भात सरकारने काही योजना कराव्यात अशी मागणी त्यांनी लोकसभेत केली.

२१. महाराष्ट्रातील महाबळेश्वर हे ठिकाण आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रेक्षणीय स्थळ, टुरिस्ट ट्रेनिंग सेंटर व्हावे यासाठी खा. प्रेमलाकाकींनी प्रयत्न केले.

२२. महिलांना क्रीडा क्षेत्रातही प्रोत्साहन मिळावे याकरीता सरकारने क्रीडा क्षेत्रास अनुदान दिले जावे त्याचबरोबर महिलांसाठी पुणे येथे स्वतंत्र स्टेडियम निर्मितीसाठी श्रीमती प्रेमलाकाकींनी विशेष प्रयत्न करून ते मंजूर करून घेतले.

२३. मुंबईतील कापड बाजार कामगारांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न केला.

२४. हळद व्यापारासंदर्भात मदत :

१९८७ साली केंद्रिय अर्थसंकल्पामध्ये मसाल्याच्या उत्पादनावर १५ टक्के अबकारी कर लादण्यात आला. त्यामुळे सांगलीतील सर्व गिरण्या बंद पडल्या. याचा परिणाम असा झाला की, या भागातील ४० ते ५० हजार कामगार बेकार झाले होते. या समस्येमुळे सांगलीतील हळद व्यापाराचे महत्त्व संपुष्टात आले. तेव्हा ''श्रीमती प्रेमलाकाकी यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्रात खासदारांची एक फळी उभी केली. ही समस्या त्यांनी तत्कालीन अन्नमंत्री एच्.के. एल्. भगत व भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांचेसमोर मांडून केंद्रिय अर्थसंकल्पात बदल घडवला. हा अबकारी कर पूर्णपणे रद्द करण्याची महत्त्वपूर्ण कामगिरी त्यांनी केली.''[२१]

२५. कोयना धरणाच्या पुनर्वसित लोकांसाठी ही त्यांनी महत्त्वाचे कार्य पार पाडले. धरणग्रस्तांना मिळणारी सरकारी मदत, पैसे लोकांकडून लुबाडली जाऊ नये म्हणून त्यांनी महिला मंडळ व अल्प बचत अधिकारी याची टीम बरोबर घेऊन धरणग्रस्त भागात पोस्ट ऑफिसच्या शाखा सुरू करावयास लावल्या. धरणग्रस्तांचे पैसे अल्पबचतीमध्ये सुरक्षित गुंतविले.

२६. मुंबईमधील फळविक्रेत्याना, हुंडेकरांना लायसेन्स मिळवून देऊन फळ उत्पादकांना दिलासा दिला.

२७. ''मेढा येथील कण्हेर धरणग्रस्तांचे पुनर्वसन संदर्भात मदत करण्याचा प्रयत्न श्रीमती प्रेमलाकाकींनी केला. यासंदर्भात त्यांनी गावोगावी पदयात्रा काढली, लोकजागृती केली.''[२२]

२८. ''दुध उत्पादकांना रास्त भाव मिळावा यासाठी शासनाकडे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले.

२९. धोम धरणाचे रेंगाळत पडलेले काम पुन्हा नव्या जोमाने व्हावे यासाठी सरकारकडे आग्रह धरला.

३०. राष्ट्रीय एकतेसाठी मसूर येथे हिंदी शिक्षण केंद्र, हिंदी बी.ए. शिक्षा विशारद कोर्स सुरू केले.

३१. कराड-उंब्रज परिसरात एम.आय.डी.सी.उभारण्यात यावी यासाठी प्रयत्नशील होत्या.

३२. येळगाव एस.टी. शेड व नळपाणी पुरवठा यासाठी मदत केली.

३३. अनेक माध्यमिक शाळांसाठी प्रयत्न केले व मान्यता मिळवून दिली.''[२३]

३४. ''२० कलमी कार्यक्रमानुसार मॉन्टेसरी कोर्स करणाऱ्या महिलांना स्वयंरोजगार महिला निराधार योजनासाठी प्रयत्न केले.

३५. कराड टी.व्ही. केंद्रासाठी प्रयत्नशील.

३६. ओंड, येळगाव टेलिफोन एक्सचेंजसाठी प्रयत्नशील.''[२४]

३७. **''ताकारी योजनेसाठी प्रयत्न :**

कराड व पाटण तालुक्यातील गोरगरीब व जिराईत शेती करणाऱ्या शेतकऱ्याची शेती ओलिताखाली आणण्यासाठी मराठवाडी, मोरणा, सावरघर धरणांना महाराष्ट्र शासनाने मंजूरी दिली. त्यावेळी खा. प्रेमलाकाकीनी धरणांचे काम व्यवस्थित सुरू होण्याविषयी महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री वसंतदादा पाटील व तत्कालीन पाटबंधारे मंत्री ना. शिवाजीराव पाटील-निलंगेकर यांच्याशी चर्चा केली. कराड तालुक्यातील १७ गावांना ताकारी योजनेप्रमाणे शासकीय खर्चाने पाणी लिप्ट करावे ही योजना मंजूर करण्यासाठी प्रेमलाकाकीचा पुढाकार होता.''[२५]

३८. पुण्याच्या टी.व्ही. रिले केंद्राचे उपकेंद्रे कराड तालुक्यातील वसंतगड येथे सुरू करावे अशी मागणी केली. यासाठी त्या प्रसारण मंत्री वंसतराव पाटील, खासदार मंत्री ना. विठ्ठलराव गाडगीळ इ. ना भेटून हा प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

३९. कराड लोकसभा मतदार संघामध्ये ज्या गावांना पाणी पुरवठा योजना नाहीत त्यांची माहिती संकलित करून मंजूर करून घेतले.

४०. **कराड तालुका जिल्हा करण्यासाठी प्रयत्नशील :**

खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी स्वतंत्र कराड जिल्ह्याची मागणी केली. कै. यशवंतराव चव्हाण यांना ही कराड हा जिल्हा व्हावा असे मनापासून वाटत होते. त्याचबरोबर सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची अशी मागणी होती. श्रीमती प्रेमलाकाकी यांनी यासाठी अनेकवेळा प्रयत्न केले.

कराड जर स्वतंत्र जिल्हा झाला तर स्वतंत्र जिल्ह्यासाठी सरकारकडून ज्या सोयी-सुविधा मिळतात. त्या कराडला मिळतील त्यामुळे कराडसारख्या विकसनशील शहराला अधिकाधिक वाव मिळेल. कराडची लोकसंख्या अधिक आहे. त्यामुळे कराडचे कराड उत्तर व कराड दक्षिण असे दोन मतदारसंघ केलेले आहेत. यामुळे कराड दोन भागात विभागलेले आहे.

उंब्रज, ढेबेवाडी, तारळे या मोठ्या गावांना जर तालुक्याचा दर्जा दिला तर सहा तालुक्याचा कराड हा जिल्हा होईल. शिराळा आणि वाळवा तालुक्याचा काही भाग कराड तालुक्यास जोडला तर आठ तालुक्यांचा कराड जिल्हा होईल.

कराड, ढेबेवाडी, तारळे, उंब्रज या भागातील गरिब, शेतकरी, कष्टकरी, कामगार यांना आपल्या कामासाठी सातारला जावे लागते. त्यामुळे त्यांना आर्थिक भूर्दंड सोसावा लागतो. जनहितासाठी कराडला जिल्हा म्हणून मान्यता द्यावी अशी मागणी श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण आणि राजकीय कार्यकर्त्यांनी केली होती.

## ४१. बेळगांव प्रश्नासंदर्भात :

१९७६ साली बेळगांव प्रश्नाबाबत श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांच्या नेतृत्त्वाखाली चंदीगडचे आमदार व्ही.के. चव्हाण-पाटील, बेळगांवचे आमदार श्री. देसाई यांनी प्रेमलाकाकींसमवेत महाराष्ट्र-कर्नाटक सिमावरील लोकांच्या हालअपेष्टा पाहिल्या. या समस्या त्यांनी तत्कालीन पंतप्रधान इंदिराजींसमोर ठेवल्या. ‘‘तेंव्हा इंदिराजीनी तात्काळ निर्णय घेऊन कर्नाटक राज्यशासनाला सुचित केले की, सिमाक्षेत्रातील जनतेवर कोणत्याही मातृभाषेचे बंधन घालू नये. त्यावेळी निपाणी, पडलेहाळ, चिक्कोडी, खानापूर, बेळगाव या परिसरातील मराठी लोकांना संरक्षण मिळाले.’’[२६]

४२. औद्योगिक क्षेत्रात स्त्रियांना राखीव जागा मिळण्यासाठी श्रीमती प्रेमलाकाकी यांनी प्रयत्न केले. स्त्री हक्काबाबत आग्रही राहिल्या. "कोल्हापूर-दिल्ली थेट रेल्वे मागणीसाठी प्रयत्न केले. महाबळेश्वर आंतरराष्ट्रीय पर्यटन केंद्र करण्यासाठी अनेक देशांचे दौरे, महिलांसाठी छोटी उद्योग शिबीरे घेतली. १९४०-५० यावर्षी चित्रमय जगतातून लेखन केले."[२७] १९५०-६० शेकापतून कै. आनंदराव चव्हाण कार्यरत असताना त्यांना मोलाची साथ दिली. १९६० पासून १९९१ पर्यंत काँग्रेसची एकनिष्ठ सेवा केली.

४३. **नवनेतृत्त्वाची निर्मिती :**

श्रीमती प्रेमलाकाकींचे संघटनात्मक कार्य म्हणजे त्यांनी अतिशय प्रतिकूल स्थितीत महाराष्ट्रात आपल्या कराड मतदारसंघात इंदिरा काँग्रेसची स्थापना केली. महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसच्या पहिल्या अध्यक्षा श्रीमती प्रेमलाकाकी या होत्या.

१९७८ आणि १९८० मध्ये श्रीमती प्रेमलाकाकी यांनी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अध्यक्षपद भूषविले. दोन वेळा त्यांनी विधानसभेची आमदारकीची तिकीट वाटपाचे कार्य त्यांनी केले. या कालावधीमध्ये त्यांनी महाराष्ट्रातील सामान्य कुटूंबातील होतकरू कार्यकर्त्यांना तिकीट देऊन बहुमताने निवडून आणले. काही ठिकाणी त्यांनी प्रस्थापितांविरोधात नवनेतृत्त्वाला संधी दिलेली होती. असा निर्णय घेण्याचे धाडस काँग्रेस पक्षात केवळ श्रीमती प्रेमलाकाकी यांच्यामध्ये होते. कोणतेही नेतृत्त्व त्यां निवडत असताना त्या नेतृत्त्वाची राजकीय पार्श्वभूमी, त्याची आर्थिक स्थिती पहात नसत तर त्या व्यक्तीतील नेतृत्त्वगुण हेरून त्याला संधी देत असत. त्यांनी अत्यंत गरिब व्यक्तीला ही नेतृत्त्व करण्याची संधी दिली. अशी उदाहरणे कराड लोकसभा मतदारसंघात आहेत. उदा. दिग्वीजय खानविलकर (कोल्हापूर), आ. भास्करराव

शिंदे (मलकापूर, कराड), हरिभाऊ कडव, विक्रमसिंह घार्गे, जयंत आवळे, जयसिंगराव लाड, विजयनवल पाटील इ. होत.

## ४४. जनसामान्याकडे ओढा :

खा. श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण समाजकारण करणाऱ्या महिला होत्या. ज्या काळात महिला समाजकारणात, राजकारणात पुढे येत नव्हत्या त्या काळात त्यांनी समाजकारण केले त्याचबरोबर राजकारणातही आपला ठसा उमटविला.

सामाजिक, राजकीय कार्य करत असताना श्रीमती प्रेमलाकाकी यांनी सर्वसामान्य जनतेची अधिक सेवा केली. ''म.गांधी, शाहू महाराज यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर होता. या विचाराप्रमाणे त्यांनी आपल्या कार्याचा रोख नेहमी व्यापक ठेवला.''[२८] कोणतेही काम करत असताना त्यांना वेळेचे भान रहात नसे. सामान्यातील सामान्य व्यक्ती जरी मदतीसाठी त्यांच्याकडे आली तरी त्यांना कधी त्या डावलत नसत. त्या लोकानाही प्रेमलाकाकी कधी परक्या वाटत नव्हत्या. त्यामुळे निसंकोच लोक त्यांच्यासमोर रहात असत. ''आपल्या कार्यकर्त्यांना त्यांनी मातृत्त्वप्रेम दिले म्हणूनच त्या कराड लोकसभा मतदारसंघात 'माँ' म्हणून तर महाराष्ट्रात सर्वांच्या 'काकी' म्हणून प्रसिद्ध झाल्या.''[२९] त्यांच्या कार्यात स्थानिक विरोध असला तरी जनसामान्यांचा, कार्यकर्त्यांचा त्यांनी खंबीर पाठिंबा असल्यामुळे त्यांनी सामाजिक, राजकीय कार्ये यशस्वीपणे केली.

खा.श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांनी आपल्या कराड लोकसभा मतदार-संघात महाराष्ट्रात, देशात सामाजिक, आर्थिक, सहकार, राजकीय, शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे कार्य केले.

"भारतामध्ये महाराष्ट्र हे सामाजिक व सांस्कृतिकदृष्ट्या, शैक्षणिकदृष्ट्या प्रगतशील राज्य आहे. संत ज्ञानेश्वर महाराजापासून ते महात्मा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापासून ते आजचे बाबा आमटे यांनी त्या कालखंडातील सामाजिक सुधारणेचे कार्य केले."[३०] खा.श्रीमती प्रेमलाकाकी यांनी ही आपल्या तत्त्वातून, अधिकाराच्या मर्यादेतून कोणतेही गटबाजीचे राजकारण न करता सामाजिक सुधारणा घडवून आणल्या. त्यांनी महाराष्ट्रात एक आदर्श महिला नेतृत्त्वाची भूमिका स्पष्ट केलेली आहे. कराड लोकसभा मतदारसंघामध्ये त्यांनी संस्थात्मक, सामाजिक कार्य करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांना स्थानिक राजकीय व्यक्तींचा तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे स्थानिक स्वरूपाचे कार्य त्यांच्या हातून फारसे होऊ शकले नाही. असे असले तरी त्यांनी जनसामान्यांसाठी भरूपर कार्य केले आहे. महिलांसाठी विशेष कार्य केले. पश्चिम महाराष्ट्रातील आदर्श महिला नेतृत्त्व म्हणून श्रीमती प्रेमलाकाकी चव्हाण यांना ओळखले जाते. त्यांच्या निधनानंतर महाराष्ट्रात सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात विशेष कार्य करणाऱ्या महिलांना त्यांचे नावे पुरस्कार दिला जातो. या पुरस्काराच्या मानकरी डॉ. पतंगराव कदम यांच्या सुविद्य पत्नी विजयमाला कदम आणि कराडच्या नगराध्यक्षा शारदा जाधव या आहेत.

----

# प्रकरण चौथे
## संदर्भ ग्रंथ


| | | | |
|---|---|---|---|
| १) | पाटील, विक्रम | : | राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - एम.फिल, शोधप्रबंध - 'डॉ. पतंगराव कदम यांचे नेतृत्त्व : एक राजकीय अभ्यास', पृ. ६२. |
| २) | धरमसी, खिरीश | : | मुलाखत, दि. १० फेब्रुवारी, २००८. |
| ३) | पाटील, आनंदराव | : | मुलाखत, दि. ११ ऑक्टोबर, २००७. |
| ४) | धरमसी, खिरीश | : | लेख, दैनिक ऐक्य. |
| ५) | लोटांगण सप्ताहिक. | | |
| ६) | दैनिक ऐक्य, | : | १९ सप्टेंबर, १९८३,पृ.५. |
| ७) | कित्ता. | | |
| ८) | रामप्रताप साप्ताहिक, | : | १९८४, पृ.३. |
| ९) | कित्ता. | | |
| १०) | लोकसभा डिबेट, | : | ११ एप्रिल, १०७८. |
| ११) | राज्यसभा डिबेट, | : | २३ ऑगस्ट, १९८४. |
| १२) | रामप्रताप साप्ताहिक. | | |
| १३) | धरमसी, खिरीश | : | लेख, दैनिक ऐक्य. |
| १४) | पाटील, अजित | : | मुलाखत, दि. २० मार्च, २००८. |
| १५) | रामप्रताप साप्ताहिक, | : | पृ. ४. |
| १६) | चेगणे, बसवेश्वर | : | मुलाखत, दि. ६ ऑक्टोबर, २००७. |
| १७) | दैनिक पुढारी, | : | ११ मार्च, १९७७. |
| १८) | धरमसी, खिरीश | : | दैनिक ऐक्य. |

प्रकरण चौथे


| | | | |
|---|---|---|---|
| १९) | पाटील, अजित | : | मुलाखत, दि. २० मार्च, २००८. |
| २०) | दैनिक पुढारी, | : | ८ जुलै, २००३. |
| २१) | पाटील, अजित | : | मुलाखत, दि. २० मार्च, २००८. |
| २२) | पाटील आनंदराव | : | मुलाखत, दि. ११ ऑक्टोबर, २००७. |
| २३) | शेरेकर बाळासाहेब – | : | मुलाखत, दि. १२ ऑक्टोबर, २००७. |
| २४) | धरमसी, खिरीश | : | लेख –दैनिक पुढारी |
| २५) | चव्हाण, भास्करराव | : | मुलाखत, दि. १२ जुलै, २००७ |
| २६) | पाटील, अजित | : | मुलाखत, दि. २० मार्च, २००८. |
| २७) | शिंदे, बाबूराव, लेख | : | लेख – दै. पुढारी. |
| २८) | कित्ता. | | |
| २९) | पाटील, विक्रम | : | राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – एम.फिल, शोधप्रबंध – 'डॉ. पतंगराव कदम यांचे नेतृत्त्व : एक राजकीय अभ्यास', पृ. ९०. |
| ३०) | कित्ता. | | |


-----



एका कार्यक्रमात तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी इतर मान्यवरांसमवेत खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी समवेत खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



कार्यकर्त्यांशी संवाद साधनाता खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



तत्कालीन पंतप्रधान आदरणीय इंदिराजी गांधी समवेत खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण व विद्यमान खा. श्री. पृथ्वीराज चव्हाण.




**निवडणुकीतील यश...**

कराड लोकसभा मतदारसंघातून विजयी झाल्यानंतर अशी भव्य विजयी मिरवणूक काढण्यात आली.

---



कराड लोकसभा मतदारसंघात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



सहकारी व विद्यार्थ्यांसमवेत ना. कै. आनंदराव चव्हाण व खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



पूरग्रस्त भागाला खा. श्रीमती प्रेमलाताईंची भेट.

T-5



ग्रामीण भागात वृक्षारोपण करताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण व खा. श्री. पृथ्वीराज चव्हाण.



ग्रामीण विद्यार्थ्यांना शैक्षणिक महत्त्व पटवून देताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



महिला मंडळास मार्गदर्शन करताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



सहकाऱ्यांसमवेत तत्कालीन पंतप्रधान इंदिराजी गांधी व खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



महिला मंडळाला भेट देताना तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी यांच्यासमवेत खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



वनिता मंडळास भेट देताना तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिराजी गांधी व खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



डोंगरी भागात वृक्षारोपण करताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण.



शेतकरी व ग्रामीण विकासासाठी मार्गदर्शन करताना खा. श्रीमती प्रेमलाताई चव्हाण व खा. श्री. पृथ्वीराज चव्हाण.